|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon - 425001

'A' Grade NAAC Re-accredited (3rd Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/५/नुतनी/नै.वि.२०२३-२४/ डी.ओ. 10 / 145 /२०२३ — दिनांक : 11-05-2023

प्रति,

मा. प्राचार्य/मा.संचालक
जय दुर्गा भावानी क्रिडा मंडल मेहरुण, संचलित ॐ साई शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिरसोली
ता. जळगाव जि. जळगाव

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास मान्यतेबाबत

संदर्भ :- १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी [Continuation of Affiliation] विद्यापीठास सादर केलेला प्रस्ताव.

२) विद्यापीठाद्वारे पत्र क्रमांक KBCNMU/05/ Nutani-NG-2023-24/D.O. 10/ 118/ 2023 दि. 20-04-2023 रोजी नियुक्त करण्यांत आलेली स्थानिक तपासणी समिती

महोदय /महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास मान्यता मिळणेकरिता आपण विद्यापीठास संदर्भिय पत्र क्रमांक ०१ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयासंदर्भात/मान्यताप्राप्त परिसंस्थेसंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारे संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये स्थानिक तपासणी समितीची नियुक्त करण्यांत आली होती.

सदर स्थानिक तपासणी समितीने आपल्या महाविद्यालयास/मान्यताप्राप्त परिसंस्थेस भेट देवून विद्यापीठास सादर केलेल्या अहवालाची, प्राप्त आदेशान्वये, मा. अधिष्ठाता / मंडळाने छाननी व तपासणी करून संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार व विद्यार्थी प्रवेशा संदर्भात शिफारशी करून अहवाल सादर केलेला आहे. सदरचा अहवाल मा. विद्या परिषदेच्या दि. ०६.०५.२०२३ रोजी झालेल्या सभेत मान्यतेस्तव सादर करण्यात आले असता त्यास मा. विद्या परिषदेने ठराव क्र. वि.प.ए. ४७/२०२३ दि. ०६.०५.२०२३ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

त्या अनुषंगाने, सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या विषय/अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास [ Continuation of Affiliation / Natural Growth ] त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम,२०१६ चे कलम ११४(१) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

वरील अनुषंगाने आपणांस विदीत करण्यात येते की, N.C.T.E. Norms & Standards, 2014 नुसार आवश्यक बाबींची पूर्तता करणे आपणांस बंधनकारक राहील तमेच अनुषंगिक ज्या-त्या प्राधिकरणाची देखील मान्यता घेणे आवश्यक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपल्या महाविद्यालयास देण्यांत येत असलेली मान्यता ही फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता म्हणजेच, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता देण्यांत येत असून सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आपणांस बंधनकारक राहील. .

आपणांस असेही विदीत करणेत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ नुसार संलग्नीकरणासाठी विद्यापीठाने सूचित केलेल्या अटी/त्रुटींची पूर्तता करणे आपणांस बंधनकारक असून, त्याअनुषंगाने आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या महाविद्यालयसंदर्भात / मान्यताप्राप्त परिसंस्थेसंदर्भात नमूद केलेल्या अटी/त्रुटींचे अवलोकन करून सदरच्या अटी/त्रुटींची परिपूर्ण स्वरूपात पूर्तता करावी व आवश्यक त्या कागदपत्रांसह अटीपूर्तता अहवाल ०२ महिन्यात, तथापि, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव सादर करणेपूर्वी विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर होईल अशा बेताने पाठवावा. आपण सदर मुदतीत अटी-पूर्तता अहवाल सादर न केल्यास, आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताचे कोणतेही प्रस्ताव स्विकारण्यांत येणार नाहीत व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

आपल्या महाविद्यालयात प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व ५०% शिक्षक या अटींची पूर्तता होत नसेल अशा महाविद्यालयांनी संबंधित रिक्त पदे ०२ महिन्यात भरण्यात येतील अशा आशयाचे रु. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करण्याच्या अटीवर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारास विद्यार्थी प्रवेशासह मान्यता देण्यात येत आहे.

तथापि, ज्या महाविद्यालयांना सोबतच्या तक्त्यात प्रथम वर्ष व/थेट द्वितीय वर्षाकरीता No Admission असे नमूद केलेले असेल अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता फक्त संलग्नीकरणाचे नुतनीकरणास/नैसर्गिक विस्तारास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अशा महाविद्यालयांनी प्रथम वर्षासाठी आणि थेट द्वितीय वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत तथापि, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व शिक्षक नियुक्तीसंदर्भात आणि स्थानिक चौकशी समितीने नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याबाबत रू. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले हमीपत्र सादर करण्यासह, रिक्त पदांच्या नियुक्तीसाठी पुरेसे प्रयत्न केल्याबाबतचे अनुषंगिक दस्तऐवज सादर केल्यास व त्यास अनुसरून विद्यार्थी प्रवेशास परवानगी मिळणेसंदर्भात विद्यापीठास प्रस्ताव सादर केल्यास विद्यार्थी प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल. मात्र विद्यापीठाच्या अंतिम मान्यतेनंतरच विद्यार्थ्यांना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

प्रवेश द्यावयाचे आहे.

तसेच ज्या संबंधीत महाविद्यालयांच्या केसेस अद्याप मे. कोर्टात प्रलंबीत आहेत, अशा महाविद्यालयांच्या बाबतीत मे. कोर्टाच्या आदेशाच्या अधीन राहून कार्यवाही करण्यांत येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

महाविद्यालयास NAAC/NBA करणे बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी उपरोक्तबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी, हि विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

(ग. जा. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग

सोबत :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नुतनीकरणाचा तक्ता.

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२) मा. विभागीय संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, मानस भवन, श्यामला हिल्स, भोपाळ-०२
३) मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
४) मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पहिला मजला जीवन प्राधिकरण भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जळगांव
५) मा. संगणक विभाग प्रमुख, संगणक विभाग, कबचौ उ.म.वि., जळगांव
६) मा. सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, कबचौ उमवि, जळगांव
७) मा. समन्वयक, ई सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगांव

२) मा. उपकुलसचिव /सहा. कुलसचिव, संबंधित विद्याशाखा, परीक्षा व मूल्यमापन मंडळ परीक्षा विभाग, कबचौउमवि जळगांव

जा.क्र. कबचौउमवि/५/नुतनी/नै.वि.२०२३-२४/ डी.ओ. 10/ 145/२०२३, दिनांक : 11-05-2023 चे सहपत्र

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता <u>शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या</u> संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचा तक्ता

| Name of College / Recognized Institute | Details of Additional Division for Nutanikaran for A.Y 2023-24 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Nutanikaran for A.Y 2023-24 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Natural Growth for A.Y 2023-24 [As per Proposal] | A] Observations of Present LIC B] Conditions of Previous LIC C] Conditions of Present LIC | **Approval of University to Continuation of Affiliation for A.Y.2023-24** |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| [E100105] - JAY DURGA BHAVANI KRIDA MANDAL MEHRUNS OM SAI COLLEGE OF EDUCATION SHIRSOLI Tal. Jalgaon Dist. Jalgaon | | B.ED. (GENERAL) - First Year - All Compulsory Subjects - 50<br>B.ED. (GENERAL) - Second Year - All Compulsory Subjects - 50 | | A] Infrastructure physical environment is good . Drinking water facilities is good separate wash room are available male and female student muster is maintain<br>B] --<br>C] 1)EPF account is not open from salary 2) Regular principal appointment is not done by NCTE norms 3) appoints 3 Teachers according to as per NCTE norms 4) appoint 2 clerk and 2 peon 5) academic record should be maintain | Continuation of Affiliation has been granted for Academic Year 2023-24, subject to fulfillment of the things as mentioned in the letter within 02 months, however, preferably before submitting the proposals of Affiliation for A.Y. 2024-25. |

(ग. ना. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग